**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार**

**क्र. : मुमाआ/नों. क्र. १९०७/२१/त. क्र. १७/२३/०१**

**श्री. शिवाजी जगन्नाथ वाडेकर**
ओम साई निवास प्लॉट नं ३१,
अंजली कॉलनी, गेडांमाळ-शाहुपूरी सातारा.

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
५ वा मजला (विस्तार), दालन क्र.५२०,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

**प्रथम अपिलिय अधिकारी तथा उपसचिव**
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
५ वा मजला (विस्तार), दालन क्र.५२०,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

| | | |
|---|---|---|
| **तक्रारीचा दिनांक** | : | २०.०२.२०२१ |
| **सुनावणीचा दिनांक** | : | **०६.०१.२०२३/२४.०३.२०२३** |
| तक्रारदार | : | उपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

**उक्त प्रकरणी दिनांक ०६.०१.२०२३ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:**

तक्रारदार यांनी दि.२२.११.२०१८ रोजी दाखल केलेल्या द्वितीय अपीलाबाबत अपील क्र.मुमाआ नों.क्र.५५०८/१८/अ.क्र.१८६/२०/०१ आदेशानुसार (१) मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी कृषि पदवीधर दुग्धशाळा पर्यवेक्षकांना उच्च प्रारंभिक वेतनश्रेणी दि.०१.०४.१९७६ पासून रुपये ४१०-७६० अशी मंजूर करण्याकरीता दिलेल्या निर्देशानुसार प्रस्तुतचे लाभ अनुज्ञेय करण्यासाठी केलेले टिपणी लेखन तसेच (२) आयुक्त, (दुग्ध) यांनी दि.३१.०१.२०१५ नुसार आर्थिक बोजाच्या तपशीलासह दुग्धशाळा पर्यवेक्षकांना उच्च प्रारंभिक वेतनश्रेणी दि.०१.०४.१९७६ पासून मंजूर होणेसाठी वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविण्याकरीता केलेल्या टिपणी लेखनाच्या प्रतीबाबत माहिती मागितलेली असून राज्य मुख्य माहिती आयोगाने दि.०४.०३.२०२० रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना त्यांच्या मूळ माहिती अर्जानुसार दोन मुद्यांची संपूर्ण माहिती ३० दिवसांच्या आत स्पीड पोस्टने नि:शुल्क पाठविण्यात यावी, असे आदेश देण्यात आले आहेत.

तथापि, तक्रारकर्त्यांना अद्याप माहिती मिळाली नसल्याने तक्रारदार यांनी दि.२०.०२.२०२१ रोजी आयोगापुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या मूळ माहिती अर्ज दि. २२.०५.२०१८ नुसार मागितलेली माहिती अद्याप तक्रारदार यांना मिळालेली नसल्याचे सांगितले.

आजच्या तक्रारीच्या सुनावणीस तक्रारदार उपस्थित. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी सहायक कक्ष अधिकारी श्री.सु. श्री. जोशी उपस्थित आहेत.

तक्रारदार यांनी विशद केले की, त्यांना अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी सहायक कक्ष अधिकारी श्री.सु.श्री.जोशी यांनी विशद केले की, त्यांना या प्रकरण संदर्भात काहीच कल्पना नाही. त्यामुळे त्यांना कोणत्याच प्रश्नाचे उत्तर देता आले नाही. प्रथम अपिलीय अधिकारी सुध्दा अनुपस्थित असल्याने तक्रार तहकूब करण्यात येत आहे.

सदर **तक्रारीची पुनर्सुनावणी दिनांक १७.०३.२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता** आयोगात प्रत्यक्ष आयोजित करण्यात येत आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पुढील सुनावणीस माहितीसह उपस्थित रहावे. त्यानंतर या प्रकरणी आदेश पारित करण्यात येतील.

आजच्या पुनर्सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, श्रीम. अंजली सादिकळे उपस्थित आहे.

तक्रारकर्ता यांनी असे विशद केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्याप पर्यंत माहिती प्राप्त झाली नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, श्रीम. अंजली सादिकळे यांनी त्यांच्यासोबत कार्यालयातील अभिलेखात उपलब्ध असलेल्या दोन नस्त्या सोबत घेऊन आल्या आहेत.

त्यावर तक्रारकर्ता यांनी असे विशद केले की, जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणलेल्या नस्त्या वेगळया विषयाशी संबंधित आहेत. मा. उच्च न्यायालयाच्या दि. २९.११.१९८९ च्या आदेशानुसार "दुग्धशाळा पर्यवेक्षकांना मंजूर वेतनश्रेणीबाबतचा प्रस्ताव" दुग्धव्यवसाय विकास विभागाने वित्त विभागाकडे पाठविण्यात आला आहे याबाबतची प्रत हवी आहे. परंतु दुग्धव्यवसाय विकास विभागाने अद्याप पर्यंत मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कोणताही प्रस्ताव तयार करण्यात आलेला नाही.

अर्थात, यावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती उपलब्ध नाही.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

**मुंबई**
**दिनांक : २४.०३.२०२३**

**(सुमित मल्लिक)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

Pragati 24.03.2023